| | | |
|---|---|---|
| **MHSN030001412024** | दाखल दिनांक | ०८/०१/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | २२/०१/२०२४ |
| | निकाल दिनांक | २०/०३/२०२६ |
| | कालावधी | ०२ वर्ष, ०२ महिने, १२ दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र. ०४, सांगली यांचे न्यायालयात**

**(पिठासीन न्यायाधीश जुबेर शब्बीर मकानदार)**

गु.र.नं. ३४८/२०२३, सांगली ग्रामीण पोलिस ठाणे, सांगली.

| | |
|---|---|
| अभियोग पक्षामार्फत | सहाय्यक सरकारी वकील श्रीमती. एम. पी. पाटील |
| आरोपी | **नाव– भारत विजय गिड्डे**<br>वय– ४७ वर्षे,<br>रा. धनगर गल्ली, नांद्रे, ता. मिरज, जि. सांगली. |
| आरोपी तर्फे विधिज्ञ | श्री. एच. एम. पाटील. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १४/११/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | १५/११/२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | ०८/०१/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | ०६/०३/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०३/१०/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | ०७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | २०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक. |

**<u>आरोपींचा तपशील</u>**

| अ.नं | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | गुन्हा कलम |
|---|---|---|---|---|
| १. | **भरत विजय गिड्डे** | दिनांक २२/११/२०२३ रोजी फौ. प्र. संहिता कलम ४१ (१) (अ) प्रमाणे नोटीस | -- | भारतीय दंड विधान संहिताचे कलम ३२३, ३२४ ५०६. |

| ६ | ७ | ८ |
|---|---|---|
| **निर्दोष सोडले अथवा शिक्षा दिली** | **ठोठावलेली शिक्षा** | **संपरीक्षेदरम्यान आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्याचा कालावधी** |
| निर्दोष मुक्तता | --- | --- |

**<u>भाग क</u>**

**<u>अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>**

**अ.अभियोगपक्ष –**

| अ.नं | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| साक्षीदार क्र.१ | पृथ्वीराज राजेंद्र चव्हाण | पंच |
| साक्षीदार क्र. २ | प्रकाश गणपतराव देसाई | फिर्यादी |
| साक्षीदार क्र. ३ | महेश नारायण देसाई | साक्षीदार |
| साक्षीदार क्र. ४ | शितल विष्णू मस्कर | पंच |
| साक्षीदार क्र. ५ | शंकर विठोबा माने | साक्षीदार |
| साक्षीदार क्र. ६ | नारायण भिमराव देसाई | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. ७ | राहुल आण्णा कोळी | पंच |
| साक्षीदार क्र. ८ | डॉ. महानंदा मधुकर हुबाले | वैदयकीय अधिकारी |
| साक्षीदार क्र. ९ | मेघराज विलास रूपनर | तपासी अंमलदार |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असेल तर**

| अ. नं | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन साक्षीदार असेल तर**

| अ. नं | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी**

**अ.अभियोगपक्ष –**

| अ.नं | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | पी–१/पी.डब्ल्यू–१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | पी–२/पी.डब्ल्यू–२ | फिर्याद |
| ३. | पी–३/पी.डब्ल्यू–४ | जप्ती पंचनाम्यावरील अ. क्र. २ वरील पंचांची स्वाक्षरी |
| ४. | पी–४/पी.डब्ल्यू–७ | जप्ती पंचनाम्यावरील अ. क्र. १ वरील पंचांची स्वाक्षरी |
| ५. | पी–५/पी.डब्ल्यू–८ | जखमी/फिर्यादी यांचे वैदयकीय प्रमाणपत्र |
| ६. | पी–६/पी.डब्ल्यू–९ | गुन्हा तपासण्याचा लेखी आदेश |
| ७. | पी–७/पी.डब्ल्यू–९ | जप्ती पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| ८. | पी–८/पी.डब्ल्यू–९ | मुद्देमाल पावती |
| ९. | पी–९/पी.डब्ल्यू–९ | जखमीचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता वैदयकीय अधिकारी यांना करण्यात आलेले पत्र |
| १०. | पी–१०/पी.डब्ल्यू–९ | आरोपीला फौ. प्र. सं. कलम ४१ (अ) (१) प्रमाणे देण्यात आलेली नोटीस |

**ब. बचाव**

| अ.नं | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन निशाणी**

| अ.नं | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड. भौतिक वस्तु**

| अ.नं | वस्तु क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | एम.ओ–१/पी.डब्ल्यू–२ | जप्त मुद्देमाल काठी |

## न्यायनिर्णय
## (घोषीत दिनांक २०/०३/२०२६)

**१.** उपरोक्त आरोपी यांच्या विरूध्द भारतीय दंड विधानाचे (थोडक्यात भा. द. वि.) कलम ३२३, ३२४, ५०६ खाली शिक्षेस पात्र अपराध केल्याच्या आरोपावरून संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

**<u>अभियोग पक्षाचे कथन –</u>**

२. प्रकाश गणपतराव देसाई (फिर्यादी) हे त्यांची पत्नी, मुलगा व बहिण असे एकत्र राहण्यास आहेत. त्यांचा मुलगा औषध डिस्ट्रीब्युटर्सचा व्यवसाय करतो. त्यावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. त्यांची शेती असून जोड व्यवसाय म्हणून त्यांनी दोन शेळया पाळलेल्या आहेत.

३. दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी हे जेवणखान करून झोपले असताना त्यांच्या शेजारी अंगणात फटाके उडवत असल्याचा आवाज आला. म्हणून ते बाहेर आले असता त्यावेळी त्यांच्या शेजारी राहणारा भरत विजय गिड्डे हा फटाके उडवत असल्याचे त्यांना दिसला. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास "घरामध्ये बांधलेल्या शेळया फटाक्याच्या आवाजामुळे काव–या बाव–या झाल्या आहेत व त्या गाभण आहेत, त्या घाबरत आहेत, इथे फटाके उडवू नको" असे म्हणाले असता त्यावेळी फिर्यादी यांचा मुलगा व पत्नी हे देखील बाहेर आले. त्यांचा मुलगा प्रशांत याने आरोपी भारत यास "शेळया घाबरत आहेत, तुम्ही येथे फटाके उडवू नका" असे म्हणाला असता आरोपी याने "तु आम्हाला विचारून शेळया पाळल्या आहेत काय" असे म्हणून फिर्यादी यांना लाथाबुक्कयांनी मारहाण केली व शेजारी पडलेल्या काठीने त्यांच्या डाव्या हातावर, डाव्या पायाला मारहाण केली. त्यावेळी त्यांचा मुलगा व त्यांची पत्नी अश्यांनी भांडणाची सोडवासोडव केली. भांडणावा आवाज ऐकून त्यांचा चुलत भाऊ नारायण व पुतण्या महेश देसाई असे भांडण सोडवण्यासाठी आले असता त्यावेळी आरोपी याने "तुम्हाला काय करायचे आहे" असे म्हणून फिर्यादी यांचा भाऊ नारायण व पुतण्या महेश यांना देखील दमदाटी केली. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपी भरत विजय गिड्डे याच्या विरोधात फिर्याद दाखल केली.

४. फिर्यादीच्या पहिल्या वर्दीवरून सांगली ग्रामीण पोलीस यांनी गुन्हा नोंद क्र. ३४८/२०२३ प्रमाणे भा. द. वि. चे कलम ३२३, ३२४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंदविला व तपास अंति दोषारोप पत्र दाखल केले.

**दोषारोप व आरोपीचे म्हणणे –**

५. सदर गुन्हयाचा तपास हा मेघराज रुपनर पोहेकॉ/१३४० यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपास अंति दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले.

६. सदर आरोपींविरूध्द भादविचे कलम ३२३, ३२४, ५०६ अन्वये दोषारोप निशाणी क्र. १० ला ठेवण्यात आले आहे. सदरचे दोषारोप आरोपीला त्याच्या भाषेत वाचून दाखविले. आरोपीने गुन्हा मान्य नसलेचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली. आरोपीचे फौ. प्र. सं. कलम ३१३ प्रमाणचे निवेदन निशाणी क्र.३८ वर नोंदवण्यात आले आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांना खोटया गुन्हयात गोवण्यात आल्याचे सांगितले आहे.

७. उभयपक्षाचे विरोधी कथनावरुन न्यायालयासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेः–

| अ. क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, आरोपी याने दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री २२.३० वाजण्याच्या सुमारास धनगर गल्ली, नांद्रे येथे फिर्यादी यांच्या घरासमोर फिर्यादींना उद्देश पुर्वक दुखापत केली आणि त्या योगे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ३२३ प्रमाणे गुन्हा केला?** | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी याने फिर्यादी यांना काठीने मारहाण करून त्यांना जखमी केले आणि त्या योगे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ३२४ प्रमाणे गुन्हा केला?** | **नाही.** |
| ३. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, वरील नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपीने फिर्यादी व इतर साक्षीदार यांना दमदाटी करण्याचे कृत्य केले आणि त्या योगे **भारतीय दंड विधानाचे शिक्षापात्र कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला?** | **नाही.** |
| ४. | **काय आदेश ?** | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

८. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एम. पी. पाटील व आरोपींतर्फे वकील श्री. एच. एम. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ ते ४ बाबतः–**

९. मुद्दा क्र. १ ते ४ वरील पुरावा एकामेकांशी संलग्नीत असल्याने कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यावरती एकत्रित रित्या विवेचन घेत आहे.

१०. आरोपींविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने फिर्यादी यांना काठीने मारहाण करून, त्यांना उद्देश्यपुर्वक दुखापत पोहोचवून दमदाटी करण्याचे कृत्य केले. सदर बाब सिध्दीकरीता अभियोगपक्षाने एकुण नऊ साक्षीदार तपासलेले आहेत. त्यामध्ये

साक्षीदार क्र. १ पृथ्वीराज राजेंद्र चव्हाण (पंच साक्षीदार) यांना निशाणी क्र. २१ वर तपासण्यात आले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १५/११/२०२३ रोजी त्यांना सांगली ग्रामीण पोलीस यांनी पंचनाम्याकरीता धनगर गल्ली, नांद्रे येथे बोलावले होते. सदर घटनास्थळ हे मारहाण झाल्याचे ठिकाण होते. सदर घटनास्थळ त्यांना फिर्यादी प्रकाश देसाई यांनी दाखवले होते. त्याप्रमाणे पोलीसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा केला. त्यांना दिनांक १५/११/२०२३ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखवला असता त्यांनी त्यातील मजकूर व त्यावरील सही मान्य केली असल्याने सदर पंचनाम्यास निशाणी पी–१ देण्यात आली आहे.

**११.** सदर पंच साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये प्रथम त्यांना सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात बोलावून पोलीसांनी पोलीस ठाण्यात देखील त्यांच्या स्वाक्षरी घेतल्या असल्याचे मान्य केले आहे. निशाणी पी–१ वरील त्यांची स्वाक्षरी देखील पोलीसांनी पोलीस ठाण्यात घेतली असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्यांची व पोलीसांची पुर्वीपासून ओळख असल्याची त्यांनी मान्य केले आहे. तसेच घटनास्थळाच्या चतुःसीमा सांगता येणार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. घटनास्थळी ते किती वाजता गेले होते हे त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ प्रकाश देसाई यांना निशाणी क्र. २४ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे फिर्यादी आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, धनगर गल्ली, नांद्रे येथे ते, त्यांचा मुलगा व त्यांची पत्नी असे राहण्यास आहेत. त्यांचा मुलगा शेती व्यवसाय करतो. दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास ते जेवण करत होते. त्यावेळी त्यांच्या शेळया या ओरडू लागल्याने ते बाहेर आले. त्यावेळी आरोपी भारत विजय गिड्डे हा फटाके उडवत असल्याचे त्यांनी पाहिले. आरोपीस त्यांनी त्यावेळी

शेळया घाबरत असल्याने व त्या गाभण असल्याने फटाके न उडवण्याची विनंती केली असता आरोपीने त्यांना मला विचारून तु शेळया पाळल्या आहेस का असे म्हणून त्यांच्या अंगावर जावून त्यांना लाथाबुक्कयांनी मारहाण केली. तसेच आरोपीने सदर ठिकाणी पडलेली काठी घेऊन त्यांना डाव्या हातावर, डाव्या पायावर मारहाण केली. सदर भांडण हे त्यांची पत्नी, चुलत भाऊ, त्यांचा मुलगा व पुतण्या असे सोडवण्यासाठी आले असता आरोपीने त्यांना देखील दमदाटी केली. त्यानंतर ते आरोपीविरुध्द फिर्याद देण्याकरीता सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये गेले व आरोपीविरुध्द फिर्याद नोंदवली. त्यांना दिनांक १५/११/२०२३ रोजीची त्यांनी दिलेली फिर्याद दाखवली असता त्यांनी ती मान्य केल्याने सदर फिर्यादीस निशाणी पी–२ देण्यात आली आहे. आरोपीस त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखले आहे. तसेच आरोपीने ज्या काठीने त्यांना मारहाण केली ती देखील त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखली आहे. सदर काठीस निशाणी एम.ओ–१ देण्यात आली आहे. त्यानंतर दिनांक १५/११/२०२३ रोजी पोलीस त्यांच्याकडे चौकशी करण्याकरीता आले होते. त्यावेळी पोलीसांनी त्यांच्याकडे चौकशी करून घटनास्थळ पंचनामा केला. सदर घटनास्थळ हे त्यांनी पोलीसांना दाखवले. वरील सर्व बाबी त्यांनी शपथेवर कथन केल्या आहेत.

१३. सदर फिर्यादी साक्षीदाराचा आरोपीच्या विधीज्ञांमार्फत विस्तृत उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये आरोपी हे त्यांच्या घरासमोर राहण्यास असल्याचे व आरोपी राहत असलेली मिळकत ही आरोपी यांच्या आजोबांनी त्यांच्या आजोबांकडून खरेदी घेतली असल्याचे मान्य केले आहे. त्यांच्यात व धनगर गल्ली येथे राहणा–या माने यांच्यामध्ये रस्त्यावरून वाद निर्माण झाले होते त्यावेळी आरोपी यांना त्यांनी त्यांच्यासोबत येण्याची विनंती करून सदर रस्त्यासंदर्भात पाहून घेऊ असे सांगितले असता आरोपी यांनी नकार दिला असल्याचे त्यांनी सांगितले आहे. आरोपी

यांना त्यांच्या अंगणातील रस्त्या व्यतिरिक्त ये जा करण्याकरीता अन्य कोणताही रस्ता नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्यांच्या वर्दीजबाबामध्ये रात्री १०.३० वाजताच्या सुमारास ते जेवण करून झोपले होते असा मजकूर नमूद असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. पोलीसांना त्यांनी त्यांच्या डाव्या हातावर व पायावर नेमक्या कोणत्या ठिकाणी मारहाण झाली होती हे सांगितले नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तसेच प्रमोद एडके, धनाजी देसाई, शंकर माने हे त्यांच्या चांगल्या परिचयाचे असल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यांच्यासोबत पोलीस ठाण्यात त्यांचा मुलगा व पुतण्या आले असल्याचे त्यांनी सांगितले आहे. परंतु पोलीसांनी त्यांचे तपासटिपण नोंदवले होते किंवा नाही हे त्यांना माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. मनोहर पाचोरे हे त्यांच्या ओळखीचे असल्याचे व त्यांच्याशी त्यांचे चांगले संबंध असल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ महेश नारायण देसाई यांना निशाणी क्र. २६ वर तपासण्यात आले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, नांद्रे येथे ते त्यांच्या आई वडीलांसोबत राहण्यास आहेत. त्यांच्या कुटुंबाचा शेती व्यवसाय आहे. प्रकाश देसाई हे त्यांच्या घराच्या पुर्व बाजूला राहण्यास आहेत. प्रकाश देसाई यांचा शेती व शेळीपालन व्यवसाय आहे. प्रकाश देसाई यांच्या दोन शेळया आहेत. प्रकाश देसाई यांचा मुलगा हा एम. आर म्हणून काम करतो. भरत गिड्डे हे प्रकाश देसाई यांच्या घरासमोर राहण्यास आहेत. दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास ते त्यांचे जेवण वगैरे आवरून घरामध्ये झोपले होते. त्यावेळी त्यांना बाहेरून फटाक्यांचा आवाज आला व त्यानंतर भांडणाचा आवाज आल्याने ते व त्यांचे वडील घराच्या बाहेर आले. त्यावेळी आरोपी भरत गिड्डे व प्रकाश देसाई यांची भांडणे सुरु असल्याचे त्यांनी पाहिले. त्यावेळी त्यांनी त्यांचे चुलते प्रकाश देसाई यांना काय झाले असे विचारले असता प्रकाश देसाई यांनी त्यांना आरोपी उडवत

असलेल्या फटाक्यांमुळे त्यांच्या शेळया घाबरत असल्याचे व शेळया गाभण असल्याचे सांगितले. त्यावेळी आरोपी यांनी त्यांच्या चुलत्यांना मला विचारून शेळया पाळल्या आहेत का असे म्हणून काठीने व लाथाबुक्कयांनी मारहाण केल्याचे त्यांचे चुलते प्रकाश देसाई यांनी त्यांना सांगितले.

१५. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, आरोपी भारत गिड्डे याने प्रकाश देसाई यांच्या डाव्या हातावर व डाव्या पायावर मारहाण केली होती. त्यावेळी प्रकाश देसाई यांचा मुलगा व पत्नी यांनी सदर भांडणे सोडवण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांचे वडील नारायण देसाई यांनी देखील किरकोळ गोष्टीवरून भांडू नका असे सांगून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आरोपी भारत गिड्डे यांनी यांचे फार झाले आहे, आता यांना दाखवतोच असे म्हणून प्रकाश देसाई व त्यांच्या वडीलांना धमकी दिली. त्या ठिकाणी शेजारची इतर लोक जमा झाली. प्रकाश देसाई यांना दुखापत झाली असल्याने ते तक्रार देण्याकरीता पोलीस ठाण्यामध्ये गेले. पोलीसांनी त्यांना सिव्हील हॉस्पीटल येथे पाठवले. त्यानंतर प्रकाश देसाई यांनी परत पोलीस ठाण्यात येऊन आरोपीविरुध्द तक्रार दिली. पोलीसांनी त्यांचा जबाब या कामी दिनांक १७/११/२०२३ रोजी नोंदवलेला आहे. आरोपी यास त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखले आहे.

१६. सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये प्रकाश देसाई हे त्यांचे चुलत चुलते असल्याने त्यांच्याशी चांगले संबंध असल्याचे व अडीअडचणीच्या वेळी ते एकमेकांस मदत करत असल्याचे सांगितले आहे. त्यांनी प्रत्यक्ष फटाके कोणी उडवले होते हे पाहिले नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासात नमूद केलेली घटना ही त्यांना त्यांचे चुलते प्रकाश देसाई यांनी सांगितली असल्याची व सदर घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिली नसल्याची मान्य केले आहे. घटनास्थळी ते गेले तेव्हा तेथे

सर्व शांत झाले होते का असे त्यांना विचारले असता घटनास्थळी थोडीफार शिवीगाळी चालू असल्याचे त्यांनी सांगितले.

**१७.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ शितल विष्णू मस्कर यांना निशाणी क्र. २८ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे जप्ती पंच आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १६/११/२०२३ रोजी त्यांना पंचनाम्याकरीता कोणत्याही पोलीसांनी बोलावले नव्हते. त्यांना सदर जप्ती पंचनामा दाखवला असता त्यांनी त्यावरील अ. क्र. २ वरील सही मान्य करून त्यातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदार हा अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरूपात प्रश्न विचारले असता त्याने सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे नोंदवली आहेत.

**१८.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ शंकर माने यांना निशाणी क्र. ५ वर तपासण्यात आले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, नांद्रे येथे ते त्यांचे आई वडील व मुलांसोबत राहण्यास आहेत. प्रकाश देसाई व आरोपी भारत गिड्डे हे त्यांच्या शेजारी राहण्यास असल्याने त्यांना ते ओळखतात. सदर घटना दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास घडली. त्यावेळी ते त्यांच्या घरामध्ये जेवण करून झोपले असताना घराच्या बाहेरून त्यांना भांडणाचा आवाज आल्याने ते बाहेर गेले असता रस्त्यावर प्रकाश देसाई व भरत गिड्डे यांच्यामध्ये भांडण सुरु असल्याचे त्यांनी पाहिले. सदरचे भांडण हे आरोपी भारत गिड्डे उडवत असलेल्या फटाक्यांमुळे प्रकाश देसाई यांच्या शेळया भूजत असल्याने सुरू होते. त्या वेळी त्यांनी सदर भांडण मिटवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी घटना पाहिली त्या वेळी भारत गिड्डे हे प्रकाश देसाई यांना शिवीगाळी करत होते. त्यांनी फिर्यादी व आरोपी या दोघांनाही किरकोळ कारणासाठी वादावादी करू नका असे समजावण्याचा प्रयत्न केला

होता. सदर भांडणामध्ये प्रकाश देसाई यांच्या हाताला व पायाला दुखापत झाली होती. त्यांना काठीने भारत गिड्डे यांनी मारहाण केली होती. त्या वेळी त्यांच्यासोबत सदर ठिकाणी प्रमोद एडके व धनाजी देसाई हे भांडण मिटवण्याकरीता आले होते. पोलीसांनी सदर घटनेसंदर्भात त्यांचे तपासटिपण दिनांक १७/११/२०२३ रोजी नोंदवले आहे. त्यांनी आरोपीला न्यायालयासमक्ष ओळखले आहे.

१९. सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये फिर्यादी व त्यांचे चांगले संबंध असल्याचे मान्य केले आहे. सदर घटना त्यांना फिर्यादी यांनी सांगितली असल्याचे त्यांनी नाकारले आहे. परंतु त्यांना त्यांचा जबाब दाखवला असता त्यांच्या जबाबामध्ये फिर्यादी यांनी ते त्या ठिकाणी गेल्यावर सदर घटना त्यांना सांगितली असल्याचे नमूद आहे व तसे पोलीसांनी का लिहून घेतले आहे याचे कारण त्यांना सांगता येणार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. आरोपी व त्यांची पत्नी फिर्यादी यांच्या विरोधात तक्रार देण्याकरीता पोलीस ठाण्यात गेल्यानंतर फिर्यादी हे देखील उलट तक्रार नोंदवण्याकरीता पोलीस ठाण्यात गेले असल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

२०. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ नारायण देसाई यांना निशाणी क्र. ३० वर तपासण्यात आले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, नांद्रे येथे ते त्यांची पत्नी व मुले यांच्यासोबत राहण्यास आहेत. फिर्यादी हे त्यांच्या घराच्या पुर्वेला राहण्यास असल्याने व ते शेती करत असल्याने फिर्यादी यांना ते ओळखतात. फिर्यादी हे शेतीसोबत जोडधंदा म्हणून शेळी पालन व्यवसाय करत असल्याचे व फिर्यादी यांच्याकडे दोन शेळया असल्याचे त्यांना माहिती आहे. तसेच आरोपी भारत गिड्डे हे त्यांच्या घराच्या उत्तर बाजूला राहण्यास असल्याने ते आरोपींना देखील ओळखतात.

२१. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर घटना दिनांक १३/११/२०२३ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास घडली. त्या वेळी ते झोपले असताना त्यांना फटाके उडवण्याचा आवाज आला. त्यावेळी त्यांनी बाहेर जाऊन पाहिले असता फिर्यादी व आरोपी यांच्यात फटाके उडवण्याच्या कारणावरून भांडण सुरु होते. सदर भांडण सोडवण्याचा त्यांनी प्रयत्न केला असता आरोपीने त्या वेळी त्यांना तुम्ही मध्ये येऊ नका, आमचे आम्ही बघून घेतो असे सांगितले. सदर भांडणामध्ये प्रकाश देसाई यांच्या हाताच्या बोटाला व पायाला दुखापत झाली होती. भारत गिड्डे व त्यांच्या कुटूंबियांनी प्रकाश देसाई यांना काठीने मारहाण केली होती. सदर भांडण मिटवण्याकरीता त्यांचा मुलगा महेश, माझी पत्नी असे उपस्थित होते. दिनांक १७/११/२०२३ रोजी पोलीसांनी या कामी त्यांचा जबाब नोंदवला आहे. त्यांनी आरोपीला न्यायालयासमक्ष ओळखले आहे.

२२. सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये फिर्यादी हे त्यांचे चुलत भाऊ असल्याचे व त्यांच्याशी त्यांचे सलोख्याचे संबंध असल्याचे मान्य केले आहे. फिर्यादी यांनी त्यांना सदर घटना सांगितली असल्याचे पोलीसांनी त्यांच्या जबाबात नमूद केले आहे व ते तसे का नमूद केले आहे याचे कारण त्यांना सांगता येणार नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

२३. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ७ राहुल आण्णा कोळी यांना निशाणी क्र. ३३ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १६/११/२०२३ रोजी सांगली ग्रामीण पोलीसांनी त्यांना पोलीस ठाण्यात बोलावले होते. त्यांना सदरचा जप्ती पंचनामा दाखवला असता त्यांनी त्यावरील त्यांची स्वाक्षरी मान्य करून त्यातील मजकूर माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर पंच साक्षीदार

हे अभियोगपक्षास सहाय्यक अशी साक्ष नोंदवित नसल्याने सरकारी वकिलांनी त्याला उलटतपासणीच्या स्वरूपात उत्तरसुचक प्रश्न विचारले असता त्याने सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे नोंदवली आहेत.

२४. अभियोगपक्षातर्फे साक्षीदारक क्र. ८ डॉ. महानंदा मधुकर हुबाले यांना निशाणी क्र. ३५ वर तपासण्यात आले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १५/११/२०२३ रोजी त्या वैदयकीय अधिकारी म्हणून सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे कार्यरत असताना प्रकाश देसाई हे सांगली ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पोलीस यादीसह रात्री १२.१० वाजण्याच्या सुमारास त्यांच्याकडे उपचाराकरीता आले होते. सदर रुग्णाने त्यांना नांद्रे येथे त्यास रात्री ११.१५ वाजताच्या सुमारास त्यांना एका ओळखीच्या व्यक्तीने काठीने मारहाण केली असल्याने त्याला छातीवर मार लागल्याचे सांगितले होते. सदर रुग्णाची तपासणी केल्यानंतर त्याला डाव्या हाताच्या मनगटावर तसेच त्याच्या डाव्या पायावर आणि मांडीवर अनेक ओरखडे उठले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. सदर जखमा या सहा तासांच्या आतील व साध्या स्वरूपाच्या होत्या. त्याप्रमाणे त्यांनी रुग्ण नामे प्रकाश देसाई यांचे वैदयकीय प्रमाणपत्र जारी केले. सदर रुग्णाचे वैदयकीय प्रमाणपत्र त्यांना दाखवले असता त्यांनी त्यावर त्यांची स्वाक्षरी व त्यांच्या दवाखान्याचा शिक्का असल्याचे सांगून त्यातील मजकूर बरोबर असल्याचे कथन केल्याने सदर वैदयकीय प्रमाणपत्रास निशाणी पी–५ देण्यात आली आहे. सदर रुग्णाला झालेल्या जखमा या लाकडी काठीने होऊ शकत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

२५. सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये काठीने मारहाण झाल्यामुळे मुकामार होऊ शकत असल्याचे सांगितले आहे. एखादया खडबडीत पृष्ठभागावर पडल्यास खरचटण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सदर रुग्ण प्रकाश

देसाई यांच्यावर आधीच गुडघ्याची शस्त्रक्रिया झाली असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. सदर रुग्णाला झालेल्या जखमा या शेतामध्ये काम करत असल्याने होऊ शकत असल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

२६. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ९ मेघराज विलास रूपनर यांना निशाणी क्र. ३७ वर तपासण्यात आले आहे. सदर साक्षीदार हे या खटल्याचे तपासी अधिकारी आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक १५/११/२०२३ रोजी ते सांगली ग्रामीण पोलीस ठाणे येथे पोहेकॉ म्हणून कार्यरत असताना त्या दिवशी ठाणे अंमलदार वांगीकर यांनी त्यांना नांद्रे येथे मारामारी झाल्याबाबत भादविस कलम ३२३, ३२४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील तपासकामी त्यांना लेखी आदेशान्वये दिला. त्यांना सदरचा लेखी आदेश दाखवला असता त्यांनी तो मान्य केल्याने त्यास निशाणी पी–६ देण्यात आली आहे.

२७. सदर आदेशासोबत त्यांना वर्दीजबाब मिळाला होता. त्यांनी वर्दीजबाबाचे अवलोकन केले असता यातील आरोपी भारत गिड्डे यांनी फिर्यादी देसाई यांना काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केलयाचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी दोन पंचांना घटनास्थळी बोलावून घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यानंतर दिनांक १६/११/२०२३ रोजी गुन्हयात वापरलेली काठी दोन पंचांसमक्ष पोलीस ठाण्यात जप्त केली. सदर जप्ती पंचनामा त्यांनी मान्य केल्याने त्यास निशाणी पी–७ देण्यात आली आहे. त्यानंतर त्यांनी जप्त केलेली काठी मुद्देमाल कारकुन यांच्याकडे पावती करून जमा केली. सदर मुद्देमाल पावती त्यांना दाखवली असता त्यांनी त्यातील मजकूर बरोबर असल्याचे व त्यावर त्यांची सही असल्याचे मान्य केल्याने सदर मुद्देमाल पावतीस निशाणी पी–८ देण्यात आली आहे. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल काठी त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखली आहे.

२८. त्यानंतर गुन्हयातील साक्षीदार यांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांच्याकडून झालेल्या गुन्हयाबाबत तपासटिपण नोंदवले. तसेच वैदयकीय अधिकारी यांना जखमींना झालेल्या मारहाणीबाबत प्रमाणपत्र मिळण्याकरीता पत्र व्यवहार केला. त्यांना दिनांक ०४/१२/२०२३ रोजीचे वैदयकीय अधिकारी यांना दिलेले पत्र दाखवले असता त्यांनी त्यातील मजकूर मान्य केल्याने सदर पत्रास निशाणी पी–९ देण्यात आली आहे. त्यानंतर सदर प्रकरणामध्ये जखमी यांचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत करून ते दोषारोप पत्रासोबत दाखल केले. सदर आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१ (अ) प्रमाणे नोटीस दिली. सदर नोटीस त्यांना दाखवली असता त्यांनी ती मान्य केल्याने सदर नोटीसीस निशाणी पी–१० देण्यात आली आहे. आरोपीविरुध्द सबळ पुरावा प्राप्त झाल्याने त्याच्याविरुध्द त्यांनी न्यायालयात दोषारोप पत्र पाठवले. त्यांनी आरोपीला न्यायालयासमक्ष ओळखले आहे.

२९. सदर साक्षीदाराचा आरोपीच्या विधीज्ञांमार्फत विस्तृत उलटतपास घेण्यात आला. सदर साक्षीदाराने उलटतपासणीमध्ये सदर खटल्यातील जप्त मुद्देमाल काठी ही बाजारात सहजपणे उपलब्ध होऊ शकत असल्याचे मान्य केले आहे. वर्दीजबाबावर व वैदयकीय यादीवर फिर्यादी यांचा अंगठा असल्याचे व घटनास्थळ पंचनाम्यावर फिर्यादी यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. फिर्यादी हे अशिक्षित असल्याने त्यांनी वर्दीजबाबावर अंगठा दिला होता किंवा कसे हे त्यांना माहिती नसल्याचे सांगितले आहे. सदर प्रकरणामध्ये फिर्यादी यांच्या शेळया गाभण होत्या या संदर्भात कोणत्याही पशु वैदयकीय अधिकारी यांचा अहवाल दाखल केला नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

३०. अभिलेखावरील सर्व साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यांचे अवलोकन केले असता साक्षीदार क्र. १ पृथ्वीराज चव्हाण यांनी घटनास्थळ पंचनाम्यास समर्थन दिले

असले तरी त्यांच्या उलटतपासणीत त्यांनी पंचनामा पोलीस ठाण्यातच सही केल्याचे मान्य केले आहे. तसेच घटनास्थळाच्या चतुःसीमा सांगता न येणे, वेळ आठवत नसणे व पोलीसांशी ओळख असल्याचे त्यांनी कबूल केले आहे. यामुळे त्यांच्या साक्षीची विश्वासार्हता कमी होते. तसेच साक्षीदार क्र. ४ शितल मस्कर व साक्षीदार क्र. ७ राहुल कोळी हे जप्ती पंच असून त्यांनी जप्ती पंचनाम्याच्या मजकुराबाबत अज्ञान व्यक्त केले आहे. दोन्ही पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. त्यामुळे जप्ती पंचनाम्याचा पुरावा संशयास्पद ठरतो.

३१. साक्षीदार क्र. २ प्रकाश देसाई (फिर्यादी) यांनी आरोपीने फटाके उडविण्यावरून वाद घालून लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण केल्याचे सांगितले आहे. त्यांनी आरोपीची ओळख व काठी (मुद्देमाल) ओळखली आहे. मात्र त्यांच्या उलटतपासणीमधून त्यांच्यात व आरोपीमध्ये पूर्वीपासून वाद असल्याचे संकेत मिळतात. त्यांनी वर्दीजबाब देत असताना ते दिनांक १४/११/२०२३ रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास जेवण करून झोपले असल्याचे नमूद असून त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये ते सदर वेळी जेवण करत असल्याचे सांगितले आहे. सदर बाबीमधून वर्दीजबाब व साक्षी पुराव्यामध्ये वेळ व परिस्थितीमध्ये विसंगती आढळून येत आहे. तसेच उलटतपासणीमध्ये पोलीसांना जबाब देत असताना त्यांना आरोपीने नेमक्या कोणत्या ठिकाणी मारहाण केली होती हे सांगितले नसल्याचे मान्य केले आहे. या बाबींमुळे फिर्यादीचा पुरावा पूर्णपणे निष्कलंक व विश्वासार्ह राहत नाही.

३२. साक्षीदार क्र. ३ महेश देसाई यांनी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नसून ती फिर्यादीकडून ऐकलेली असल्याचे उलटतपासणीत मान्य केले आहे. त्यामुळे त्यांचा पुरावा ऐकीव (hearsay) स्वरूपाचा ठरतो. तसेच साक्षीदार क्र. ५ शंकर माने यांनी मारहाण पाहिल्याचे सांगितले असले तरी त्यांच्या जबाबात विरोधाभास दिसतो. त्यांच्या

पोलीस जबाबात घटना फिर्यादीने सांगितल्याचे नमूद आहे. साक्षीदार क्र. ६ नारायण देसाई हे फिर्यादीचे नातेवाईक असून त्यांचाही पुरावा हितसंबंधित (interested witness) स्वरूपाचा आहे. त्यांच्या जबाबातही फिर्यादीने घटना सांगितल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे अभिलेखावार आलेले सर्व साक्षीपुरावे परस्पर सुसंगत नाहीत व त्यात स्वतंत्र, निष्पक्ष साक्षीदारांचा अभाव आहे.

३३. साक्षीदार क्र. ८ डॉ. हुबाळे यांनी फिर्यादीस साध्या स्वरूपाच्या जखमा असल्याचे सांगितले आहे. मात्र उलटतपासणीत त्यांनी स्पष्ट केले आहे की अशा जखमा पडल्याने, शेतीच्या कामामुळे किंवा खडबडीत पृष्ठभागावर घासल्याने होऊ शकतात. त्यामुळे वैद्यकीय पुरावा हा अभियोग पक्षाच्या कथनाला ठोसपणे आधार देत नाही.

३४. साक्षीदार क्र. ९ तपासी अधिकारी यांनी तपासाची रूपरेषा सांगितली आहे. मात्र त्यांच्या उलटतपासणीत त्यांनी सदर खटलयातील जप्त मुद्देमाल काठी हा सामान्यपणे कोठेही सहजपणे उपलब्ध होत असल्याचे मान्य केला आहे. तसेच फिर्यादी यांच्या शेळया गाभण असल्याबाबत कोणताही स्वतंत्र पुरावा गोळा केलेला नाही. यामुळे तपासी अधिकारी यांच्या तपासामध्ये त्रुटी असल्याचे दिसून येते. सदर प्रकरणातील पुराव्याचे परीक्षण करता असे आढळून येते की, संबंधित घटनेशी निगडित बाबींमध्ये तपास अधिकाऱ्यांची एकसंधता आढळत नाही. फौजदारी न्यायप्रक्रियेत, विशेषतः एकाच व्यवहारातून किंवा परस्पर संबंधित घटकांमधून उद्भवलेल्या प्रकरणांमध्ये तपासाची सुसंगती (consistency) व अखंडता (continuity) राखणे अत्यावश्यक असते. यासाठी शक्यतो एकाच तपास अधिकाऱ्याकडून तपास करण्यात येणे अपेक्षित असते, जेणेकरून घटनाक्रमाची साखळी, पुराव्यांचे संकलन, व साक्षीदारांचे जबाब यामध्ये सुसंगती राहील. मात्र सदर प्रकरणात भिन्न तपास

अधिकाऱ्यांनी वेगवेगळ्या टप्प्यांवर तपास केल्याचे दिसून येते, आणि त्या संदर्भात तपास हस्तांतरणाची कारणे, नोंदी किंवा सातत्य दर्शविणारा कोणताही विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. यामुळे तपास प्रक्रियेत सुसंगतीचा अभाव निर्माण होतो व पुराव्यांच्या साखळीमध्ये तुटकपणा (break in chain) निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते. परिणामी, तपासाची विश्वसनीयता बाधित होते व अभियोगपक्षाच्या कथनावर संशय निर्माण होतो. अशा परिस्थितीत न्यायालयास अशा त्रुटींचा विचार आरोपींच्या फायद्यासाठी करणे भाग पडते.

३५. अभिलेखावरील एकुण पुराव्यांमधून आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा न आल्याने पुर्वीच्या असलेल्या वादावरून खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही. अभियोगपक्षाने स्वतंत्र व निष्पक्ष साक्षीदार यांना या कामी तपासलेले दिसून येत नाही, तसेच या कामी तपासलेले प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या पुराव्यांमध्ये देखील विसंगती दिसून येत आहेत. त्यामुळे अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा भारतीय दंड विधान संहिता कलम ३२३, ३२४ व ५०६ अंतर्गत गुन्हा निसंशयरित्या शाबित करता आलेला नाही. फौजदारी न्यायशास्त्रानुसार, आरोपीविरुद्ध दोष सिद्ध करण्यासाठी शंकातीत पुरावा आवश्यक असतो. या प्रकरणात अभियोग पक्ष तो दर्जा गाठण्यात अपयशी ठरतो.

३६. फौजदारी न्यायशास्त्राचा मूलभूत सिद्धांत असा आहे की अभियोग पक्षाने आपला खटला संशयाच्या पलीकडे सिद्ध करणे आवश्यक आहे. जर पुराव्यामध्ये शंका निर्माण होत असेल तर त्या शंकेचा फायदा आरोपींना द्यावयाचा असतो. परिणामी अभियोग पक्ष आरोपींनी फिर्यादीस मारहाण केली, शिवीगाळ केली व दमदाटी केली ही बाब विश्वासार्ह व ठोस पुराव्याने सिद्ध करू शकलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३

यांचे उत्तर नकारार्थी देण्यात येते व मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येतो –

**आ दे श**

| | |
|---|---|
| १ | आरोपी नामे **भारत विजय गिड्डे** यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधानाचे कलम ३२३, ३२४ व ५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपी यांचा जातमुचलका रद्द करण्यात येत आहे. |
| ३ | जप्त मुद्देमाल एक कळकाच्या बांबूची ४ पेराची ७१ सेमी लांबीची व ४ सेमी व्यास असलेली काठी ही मुल्यहीन असल्याने ती अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा. |
| ४ | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) प्रमाणे रक्कम रु.२५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)**

JUBER SHABBIR MAKANDAR

Digitally signed by JUBER SHABBIR MAKANDAR
Date: 2026.03.20 18:05:06 +0530

**सांगली.** **( जुबेर शब्बीर मकानदार )**

**दि. २०/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. ०४,**

**सांगली.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment is same word as per the original Judgment.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the stenographer | : | P. D.Tingare |
| (b) | Court | : | J. S. Makandar<br>04th Jt.Civil Judge Jr.Dn.&<br>J.M.F.C.,Sangli |
| (c) | Judgment/Order signed by P.O. on | : | 20/03/2026 |
| (d) | Judgment/Order uploaded on | : | 20/03/2026 |